# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
**प्रथम खबर अहवाल**
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** धुळे शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0024 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/01/2026 22:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Date From (दिनांक पासून):** 08/01/2026
**Time Period (कालावधी):**
**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/01/2026
**Time From (वेळेपासून):** 12:27 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/01/2026 **Time (वेळ):** 22:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 033
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/01/2026 22:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हा जातप्रमाणपत्र पडताळणी,कार्यालय,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): यशवंत बोरसे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | इम्रान अब्दुल रशिद अन्सारी | | | 1. 3,80 फुटी रोड,,म्युन्सिपल कलनी, शिवाजी नगर, ,धुळे,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रमोद रामराव पाटील | | | 1. 120,ओसवाल नगर,, नगावबारी चौफुली, धुळे,,धुळे शहर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 18 अ चलनीय नोटा | 9,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

9,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

धुळे शहर पोलीस स्टेशन, गु.र.नं. 24/2026 भ्र.प्र.का. सन 1988 चे कलम 7 व 12 प्रमाणे यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे सहा महिन्यापासुन कार्यरत आहोत. दि.08.01.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप अधीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी कार्यालयात हजर असलेले तक्रारदार दानिश बदरोद्दीन शेख यांची धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयातील लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार असुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कार्यवाही करणेबाबत आम्हास आदेशित केल्याने आम्ही मा. तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी कार्यालय, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील दोन शासकिय कर्मचारी श्री सुरेश शेषराव कऱ्हाळे, सहायक कृषी अधिकारी व श्री मनोहर सुभाष पाटील, सहायक कृषी अधिकारी यांना उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, धुळे अशी ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार दानिश बदारोद्दीन शेख व सापळा पथकाची ओळख करुन दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव दानिश बदरोद्दीन शेख, वय 30 वर्ष, व्यवसाय शिक्षण, रा. 100 फुटी रोड, रहेबर बाग, अलहेरा शाळेच्या बाजुस, धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आली ती ''माझे शालक मोहम्मद रजा जाविद मुजावर याने मुजावर जातीचे (ओबीसी) प्रमाणपत्र पडताळणी करुन मिळणेकरीता दि.21.07.2025 रोजी ऑनलाईन अर्ज करुन त्याबाबतचे मुळ अर्ज व आवश्यक त्या कागदपत्र दि.12.08.2025 रोजी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे कार्यालयाकडे जमा केले होते. त्यानंतर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धुळे कार्यालयाकडुन दि. 22.10.2025 रोजी सुनावणीकामी हजर राहणेबाबत माझे शालकास पत्र दिले होते. तेव्हा सदर दिवशी मी व माझे शालक सुनावणीकामी हजर राहुन समितीकडे आवश्यक ते कागदपत्र जमा केले होते. त्यानंतर मी शालकाचे जात प्रमाणपत्र मिळणेकरीता वेळोवेळी सदर कार्यालयात जावुन पाठपुरावा करीत होतो. दरम्यान मी दि.06.11.2025 रोजी सदर कार्यालयात गेलो असता तेथे माझी प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांचेशी भेट झाली. तेव्हा त्यांनी माझे कामाबाबत विचारपुस करुन ''तुमचे जातपडताळणीचे काम करुन घ्यायचे असेल तर मला 12,000/- रुपये द्यावे लागतील. त्याशिवाय तुमचे काम होणार नाही.'' असे मला सांगितले. तेव्हा मी त्यांना आता माझयाकडे इतके पैसे नाहीत, असे त्यांना सांगितले असता त्यांनी मला ''आता 3,000/- रुपये 9373827979 या नंबरवर ऑनलाईन टाकुन बाकी काम झाल्यावर द्या'' असे सांगितले. तेव्हा मी माझे सासरे जाविद हुसेन मुजावर यांना सांगितले. परंतु त्यांच्याकडे फोनपे सुविधा नसल्याने त्यांनी त्यांचे चुलत भाऊ रफिक डॉक्टर यांचा फोनपे अकाउंट वरुन 3,000/- रुपये प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी सांगितलेल्या नंबरवर टाकले, परंतु सुमारे दोन महिने उलटुन देखील माझया शालकाचे जात पडताळणीचे काम झाले नसल्याने मी सुमारे 7/8 दिवसापुर्वी शालकाच्या जात पडताळणी प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सदर कार्यालयात गेलो. तेथे प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी हजर नव्हते. तेव्हा मी कार्यालयात कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांची भेट घेवुन त्यांना माझया शालकाचे प्रकरणाबाबत विचारपुस केली

असता त्यांनी मला ''मी तुमचे जातपडताळणीचे काम करुन देतो, त्याकरीता तुम्हाला मला 10,000/- रुपये द्यावे लागतील. पैशांशिवाय तुमचे काम होणार नाही.'' असे सांगुन लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी व कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने त्यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी व कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांची त्यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठीे पंच नं. 01 सुरेश कऱ्हाळे यांची दुचाकी क्रमांक एम.एच. 18 एई 1971 ने तक्रारदार दानिश शेख व पंच नं. 01 सुरेश कऱ्हाळे यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच सुरेश कऱ्हाळे असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 कऱ्हाळे यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात जावुन प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांचेशी त्यांच्या शालकाच्या जात पडताळणी प्रकरणाबाबत व तक्रारदार यांच्या सासऱ्यांनी या अगोदर फोनपेवर दिलेल्या 3,000/- रुपयांबाबत चर्चा करुन कामाबाबत विचारुन सांगतो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांच्याशी त्यांच्या प्रकरणाबाबत चर्चा करुन तक्रारदार यांना दोन दिवसात कॉल करुन सांगतो अशी हकिगत कथन केली. सदर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित झालेल्या संभाषणाची एेकुन खात्री करण्यात आली. दरम्यान कार्यवाही सुरु असतांना तक्रारदार यांनी त्यांना प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांचा फोन येवुन त्यांनी तक्रारदार यांना त्यांच्या शालकाचे प्रकरण दाखवतो असे सांगुन कार्यालयात बोलविल्याचे सांगितले. व्हा आम्ही तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांची त्यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठीे पंच नं. 01 सुरेश कऱ्हाळे यांची दुचाकी क्रमांक एम.एच. 18 एई 1971 ने तक्रारदार दानिश शेख व पंच नं. 01 सुरेश कऱ्हाळे यांना रवाना केले. त्यानतर काही वेळाने तक्रारदार व पंच सुरेश कऱ्हाळे असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 कऱ्हाळे यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात जावुन प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांचेशी त्यांच्या शालकाच्या जात पडताळणी प्रकरणाबाबत चर्चा करुन त्यांच्या शालकाचे प्रकरण दाखवुन तडजोडीअंती या अगोदर दिलेले 3,000/- रुपयांव्यतिरिक्त 9,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची हकिगत कथन केली. सदर डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रित झालेल्या संभाषणाची एेकुन खात्री करण्यात आली. तसा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर दि. 08.01.2026 रोजी पडताळणी पंचनामा दरम्यान कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांनी तक्रारदार यांना त्यांच्या शालकाच्या प्रकरणाबाबत 2 दिवसात फोन करुन कळवितो असे सांगितले. परंतु कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांचा तक्रारदार यांना फोन न आल्याने आम्ही दि.12.01.2026 रोजी तक्रारदार यांना कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांना भेटण्यास पाठवुन पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सुचना देवुन तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन त्यांना धुळे ला.प्र.वि. कार्यालयातुन प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी व कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांची त्यांचे कार्यालयात भेट घेण्यासाठीे पंच नं. 01 सुरेश कऱ्हाळे यांची दुचाकी क्रमांक एम.एच. 18 एई 1971 ने तक्रारदार दानिश शेख व पंच नं. 01 सुरेश कऱ्हाळे यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच सुरेश कऱ्हाळे असे कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 कऱ्हाळे यांना विचारणा केली असता त्यांनी ते व तक्रारदार धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात जावुन तक्रारदार यांनी कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांची भेट घेतली. भेटी दरम्यान प्रमोद पाटील व तक्रारदार यांचेत तक्रारदार यांच्या शालकाच्या जात पडताळणी प्रकरणाबाबत चर्चा झाली. तेव्हा कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांनी तक्रारदार हे अगोदर प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांना भेटले असल्याने त्यांच्या कडुनच काम करुन घेणेबाबत तक्रारदार यांना सांगुन तुमचे काय झाले आहे, त्यांच्या पध्दतीने करुन घ्या असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांची भेट घेतली असता त्यांच्यात तक्रारदार यांच्या प्रकरणाबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान अन्सारी यांनी त्यांना कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांनी तक्रारदार यांच्या प्रकरणासंदर्भात केलेल्या कॉलचे रेकॉर्ड झालेले संभाषण मोबाईलचा स्पिकर सुरु करुन एेकविले. त्यामध्ये कनिष्ठ लिपीक पाटील यांनी प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांचेशी तक्रारदार यांच्या प्रकरणाबाबत विचारपुस करुन तक्रारदार यांनी तुझे पैसे दिले का? बाबत विचारणा केली. तेव्हा प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी बाकी आहेत असे सांगितल्याची हकिगत कथन केली. तसा ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.त्यानंतर आज दि.19.01.2026 रोजी सापळा आयोजित केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्याकडे सापळा कारवाईकामी पैसे नसल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात उपलब्ध असलेल्या

अचलनीय नोटा वापरण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर 500/- रुपये दराच्या 18 अचलनीय नोटा काढुन सदर अचलनीय नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 सुरेश कऱ्हाळे अशांना पंच क्र.01 यांच्या दुचाकीने धुळे जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 मनोहर पाटील, पोहेकॉ. संतोष पावरा, पोकॉ. मकरंद पाटील, पोकॉ. प्रशांत बागुल यांचेसह खाजगी वाहन क्रमांक एम.एच. 01 डीपी 1478 ने जावुन धुळे जिल्हा जात पडताळणी कार्यालयासमोरील रस्त्यालगत वाहन थांबवुन आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा पंच नं. 1 यांनी ते व तक्रारदार यांनी कार्यालयात येवुन प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांची भेट घेतली. तेव्हा अन्सारी यांनी तक्रारदार यांना पैशांबाबत हाताने इशारा केला. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम बाहेर काढुन अन्सारी यांच्या समोर धरली असता प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी त्यांना सदर लाचेची रक्कम त्यांच्या टेबलावरील पेन ठेवण्याच्या प्लास्टीकच्या बॉक्समध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लाचेची रक्कम टेबलावरील पेनाच्या प्लॉस्टीकच्या बॉक्समध्ये ठेवुन बाहेर जावुन त्यांना ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक समोरुन येत असल्याचे पाहताच प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी सांगितल्याप्रमाणे तक्रारदार यांनी अन्सारी यांचे टेबलावरील लाचेची रक्कम ठेवलेला प्लॉस्टीकचा बॉक्स कार्यालयातील हॉलच्या कोपऱ्यात फेकुन दिला असल्याचे सांगितले. तेव्हा आम्ही पंच नं. 2 यांना कार्यालयाच्या हॉलमधील अन्सारी यांनी फेकलेला प्लास्टीकचा बॉक्स व त्यामध्ये तक्रारदार यांनी ठेवलेली लाचेची रक्कम उचलुन ताब्यात घेतली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांना व पोकॉ. प्रशांत बागुल यांनी कनिष्ठ लिपीक प्रमोद पाटील यांनी कार्यालयातुन ताब्यात घेतले. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.अशा प्रकारे इम्रान अब्दुल रशिद अन्सारी, वय 42 वर्षे, प्रकल्प सहायक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, धुळे यांनी तक्रारदार दानिश बदरोद्दीन शेख यांच्या शालकाचे मुजावर जातीचे (ओबीसी) प्रमाणपत्र पडताळणीचे काम करुन देण्यासाठी दि.08.01.2026 रोजी पंचांसमक्ष 9,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले होते. त्यानंतर दि. 12.01.2026 रोजी प्रमोद रामराव पाटील, कनिष्ठ सहायक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, धुळे यांनी तक्रारदार यांना प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांना भेटुन त्यांचेकडुनच काम करुन घेणेबाबत सांगुन तुमचे काय झाले आहे, त्याप्रमाणे करुन घ्या असे सांगुन तक्रारदार यांना प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांना लाचेची रक्कम देण्यास अपप्रेरणा देवुन प्रोत्साहित केले. तसेच आज दि.19.01.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान प्रकल्प सहायक इम्रान अन्सारी यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन धुळे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालयात 16:30 वाजता 9,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 व 12 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

dipak dagadu patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): dipak dagadu patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
धुळे शहर पोलीस स्टेशन